नि.फौ.ख.क्र.१६१/२०२०
सरकार वि.धर्मराज
नि.क्र.३९

साक्षीदार क्र **०८** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–गणेश हरिहर राय,
वय ५४ वर्ष, व्यवसाय– पोलिस उपनिरिक्षक,
राह.पोलिस स्टेशन सावनेर.तह.सावनेर, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री. जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

१. मी बेला पो.स्टे.येथे सन २०१५ ते २०२१ या कालावधीत कार्यरत होतो. माझ्याकडे गु.र.न.१९६/२०२० चा तपास वर्ग करण्यात आला होता. त्यावेळी माझ्याकडे ऑकरन्स रिपोर्ट दिली. आता मला सदर ऑकरन्स रिपोर्ट दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **निशानी क्र.४०** देण्यात आला. त्यानंतर सदर ऑकरन्स रिपोर्ट हा पो.स्टे.बेला येथे पाठविण्यात आला. त्यानंतर गुन्ह्याची नोंद करण्यात आली. मला तपासाकामी तोंडी रिपोर्ट, ऑकरन्स रिपोर्ट, प्रथम खबर अहवाल, मेडिकल रिपोर्ट इ. प्राप्त झाला. त्यानंतर मी पंचांना समन्सपत्र दिले व घटनास्थळावर जाऊन घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला समन्सपत्र दाखविण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **निशानी क्र.४१** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहे त्यास **निशानी क्र.४२** देण्यात आला. त्यानंतर घटनास्थळाचे फोटो काढले. आता मला सदर फोटो दाखविण्यात आला त्यास यापुर्वीच आर्टीकल अ देण्यात आलेला आहे. त्यानंतर पंचांचे व साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले.

२. त्यानंतर आरोपीकडुन गुन्ह्यात वापरलेली तुतारी जप्त केली व त्याबाबतचा जप्ती पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहे त्यास **निशानी क्र. ४३** देण्यात आला. मी घटनास्थळाचा फोटो काढला होता. आता मला सदर फोटो दाखविण्यात आला त्यास यापुर्वीच आर्टीकल ब देण्यात आलेला आहे. मी क्वेरी रिपोर्ट प्राप्त करण्याकामी वैद्यकिय अधिकारी यांना पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास यापुर्वीच नि.क्र.३४

देण्यात आलेला आहे.

३. मी सा.क्र.२ मकतुम मेहबुब शेख यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. आता मला त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला जो मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.४४** देण्यात आला. मी सा.क्र.५ राकेश वसंतराव फटिंग यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. आता मला त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला जो मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.४५** देण्यात आला. मी सा.क्र.६ सुनिल ज्ञानेश्वर नागोसे यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. आता मला त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला जो मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.४६** देण्यात आला. मी सा.क्र.३ दिलीप हरिभाऊ कामडी यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. आता मला त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला जो मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.४७** देण्यात आला.

४. मी जखमी यांची वैद्यकिय तपासणी करण्याकामी वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र सिर्सी यांना पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **निशानी क्र.४८** देण्यात आला. तपासाअंती असे निष्पन्न झाले की, आरोपीविरूध्द भरपुर पुरावा मिळून आलाला आहे त्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**सरतपास संपला.**

**आरोपीच्या वकीलांतर्फे नि.क्र.४९ वरील अर्जाप्रमाणे उलटतपास तहकूब करण्याची विनंती केली. सबब उलटतपास तहकूब.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १३.११.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड